International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# रुकडी जि.कोल्हापूर येथील राजेबागस्वार दर्गा एक ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन

**डॉ.खंडेराव शिंदे**
राजर्षी शाहू कला व वाणिज्य महविद्यालय,रुकडी जि.कोल्हापूर
*Corresponding Author-* डॉ.खंडेराव शिंदे
Email- khandushinde1967@gmail.com

**प्रास्ताविक –**

छत्रपती शिवाजी महाराजानी स्थापन केलेल्या पहिल्या हिंदवी स्वराज्याचे आठराल्या शतकाच्या पहिल्या दशकात महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज ( सातारा ) यांच्यातील संघर्षातून सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. सन १७१० मध्ये महाराणी ताराबाईंनी 'पन्हाळा' येथे कोल्हापूर राज्याची स्थापना केली. अशा या कोल्हापूर राज्यात सध्याच्या कोल्हापूर जिल्हात अनेक ऐतिहासिक व धार्मिक स्थळे आहेत. यामध्ये हिंदू , इस्लाम , लिंगायत जैन धर्मिय स्थळाचा समावेश आहे. या पैकी एक रुकडी येथील राजेबागस्वार दर्गा एक महत्वाचे ऐतिहासिक व धार्मिक पर्यटन स्थळ आहे. या स्थळाचा इतिहास व धार्मिक महत्वाची माहिती करून देण्याच्या उद्देशाने हा शोधनिबंध मी सादर करत आहे.

**रुकडीचा इतिहास -**

रुकडी हे कोल्हापूर जिल्हातील हातकणंगले तालुक्यात एक महत्वाचे गाव आहे. येथे कसब असणारे लोक राहतात. याशिवाय येथे दर गुरुवारी आठवडी बाजार भरतो. म्हणूनच या गावाला कसबा रुकडी म्हंटले जाते. रुकडी पंचक्रोशीत माणगाव , साजणी, तिळवणी, अतिग्रे , चोकाक , माले, मुढशिंगी , हेरले हि गावे येतात. रुकडी हे कोल्हापूर मिरज लोहमार्गावर असून कोहापुराच्या पूर्वेला १४ किमी अंतरावर आहे. रुकडीच्या पश्चिम दिशेला पंचगंगा नदी आहे. अशी ही रुकडी समुद्र सपाटीपासून ५६० मीटर उंचीवर असून 16.४० उत्तर अक्षांश व ७४.२०.पूर्व रेखांशावर आहे. रुकडी येथे पूर्वी रुक्मादेवी नावाची देवी ( राक्षसीण )होती. तिच्या नावाचा अपभ्रश होऊन रुकडी हे नाव पडले. रुकडीमध्ये जुने महादेव मंदिर, राजेबगस्वार व सूर्यपान यांचा दर्गा व राजर्षी शाहू कालीन अंबाबाई मंदिर आहे. येथे पूर्वी १२ मीटर उंच व ५३ मीटर रुंद असे गोपूर होते. याचा उपयोग कैद्यांना ठेवण्यासाठी केला जाई. रुकडी येथील राजेबगस्वार व सूर्यपान यांचा उरूस महाशिवरात्रीच्या पाचव्या दिवशी असतो. हिंदू मुस्लिम जैन धर्मिय एकत्र येऊन उरूस साजरा करतात. हा उरुस म्हणजे रुकडीच्या ग्रामोस्त्व असतो. राजेबागस्वार हे सुफी पंथाचे होते.

**'सुफी' याचा अर्थ -**

'सुफी' या शब्दाचा व्यत्वत्तीबद्दल सहा मत प्रवाह आहे. या सहाव्या मत प्रवानुसार 'सुफी'हा शब्द सुफी ( लोकर ) या शब्दापासून तयार झाला. जे लोक आपल्या शरीरावर लोकराचे वस्त्र धारण करत त्यांना 'सुफी' म्हंटले जाते. हे सुफी संत लोकराचे जाडे भरडे वस्त्र परिधान करून ऐश्वर्य व भोग विलासा पासून दूर राहून साधे जीवन जगत फक्त ते आध्यत्मिक साधनेमध्ये मग्न असत. ते संयमी व वैराग्यपूर्व जीवन जगत. इस्लाम राजवटीपूर्वीच सुफी संत भारतात आले. यांचा सत्ताधारी वर्ग, विविध धर्म व सामान्य जनतेशी संपर्क आला. 'सुफी' हे इस्लाम धर्माचे प्रचारक होते.

**कव्वालाच प्रारंभ -**

सुफी संतांनी आपले संदेश जन माणसापर्यन्त पोहचवण्यासाठी ज्या काव्य प्रकारचा उपयोग केला त्याला कव्वाली म्हंटले जाते. या कव्वालीचा उदय कविकास मध्ययुगात झाला असून अमीर खुसरो हे

कव्वालीचे जनक आहेत. जेव्हा ही सुफी संत मंडळी भारतात आली. तेव्हा तेथील लोक आपल्या धार्मिक उपासनेसाठी भजन किर्तन , गायन, संगीत व नृत्यकला महत्व घेत होती. म्हणून धर्मप्रचार व प्रसारासाठी काव्याचा उपयोग केला. कालातंराने या काव्याचे स्वरूप बदलत जाऊन आजची कव्वाली निर्माण झाली. या सुकीना गुरुची नितांत गरज असते. प्रत्येक मुस्लिमाने गुरु ( पीर ) केला पाहिजे. पीर याचा अर्थ आध्यत्मिक गुरु म्हणून या सुफी या संतांना पीर म्हंटले जाते उदा - हजरत पीर राजेबागस्वार भारतात पीरांची अनेक ठिकाणे आहेत. भाविक लोक त्यांना नवस बोलून बकऱ्या - कोंबड्याचे बळी देतात. याशिवाय मलिद्याचा ( चुरमा) नेवेद्य दाखवतात.

**रुकडीचे राजेबागस्वार -**

राजेबागस्वार हे मुस्लिम अवलिया हे वाघावर बसून फिरत. वाघाला मारण्यासाठी सापाचे चाबूक वापरत म्हणून त्यांना राजेबागस्वार म्हणतात. सुफी संती इस्लाम धर्माचा प्रसार कारण्यासाठी ते अरबस्थानातून आले. धर्म प्रसार करत रुकडीला येण्यास निघाले असता पंचगंगा नदीला पाणी असल्याने ते चिंचवाडमध्ये ता.करवीर येथे थांबले . ते ज्या ठिकाणी थांबले तेथे आजही छोटा दर्गा आहे. काहीही करून नदी पार करणे गरजेचे होते म्हणून त्यांनी वाट न बघता आपल्या जवळील धोंगडी पाण्यावर अंथरली नावेत न बसता तसे ते घोगंडीवर बसले व नदीपार करून रुकडीस आले अशा आत्ययिका आहे. त्यांनी तेथे काही काळ वास्तव्य केले तेथे आज दर्गा आहे.

**रुकडीचे राजेबागस्वार -**

हजरत पीर राजेबागस्वार चे निधन झाल्यावर जेथे दफन केले तेथे दर्गा बांधण्यात आला. या दर्ग्यात कबर असून हा दर्गा फूट हमचोक असून १८ फूट उंच होता. हा जुना दर्गा आज अस्तित्वात नाही. नवीन दर्गा आहे. याला दोन मजली दगडी नगारखाना आहे. दर्ग्यात उर्दु शाळा व दर्गा तालीम आहे.

**राजेबागस्वरांचा उरूस -**

उरूस याचा अर्थ पुण्यतिथी सोहळा रुकडी येथील राजेबागस्वारांच्या उरसाला सुरुवात महाशिवतरीच्या दिवसापासून होते. यादिवशी रुकडी कॅम्पसमधील राजर्षी शाहू कालीन अंबाबाईची मंदिरास उरूस कमिटी भेट देऊन अंबाबाईची पूजा - अर्च्या केली जाते. या पूजेनंतर आळते येथील रामलिंगाची पूजा मानकरी करतात.

**महाशिवरात्रीच्या चोंथ्या दिवशी राजेबागस्वारांची फारशी -**

असून रात्री करमणुकीचा कार्यक्रम असतो. पाचव्या दिवशी राजेबागस्वारांची गंधरात्र असते. या दिवशी रात्री भारतातील प्रसिद्ध अश्या दोन काव्वालांच्या कव्वालीचा जंगी मुकाबला असतो. महाशिवरात्रीच्या सहाव्या दिवशी राजेबागस्वारांचा उरूस असून रात्री करमणुकीचा कार्यक्रम असते आणि याच दिवशी पहाटे राजेबागस्वारांना गलेफ अर्पण केला जातो. सातव्या दिवशी पीराचा बासा ( शिळा ) उरूस असतो. यादिवशी उरुसानिमित्य कुस्त्यांचे जंगी मैदान भरवले जाते.

**राजेबागस्वारांची पूजा - अर्च्या -**

राजेबागस्वार नवसाला पावतात अशी त्यांच्या भक्तांची धारणा आहे. म्हणून भक्तगण दर गुरुवारी राजेबागस्वारांना नेवेद्य , नारळ व उद अर्पण करतात. गुरुवारी आठवडी बाजार असल्याने बाजारकरी ही दर्शन घेतात. दर्ग्याची पुजा करण्याचा मान मुजावर यांच्या कडे आहे. यामध्ये राज अस्लम मुजावर, ओला मुजावर , अमीर मुजावर नदीम मुजावर ही मंडळी राजेबागस्वार सेवा करतात.

**राजर्षी शाहू व राजेबागस्वार दर्गा -**

शिक्षणामुळेच बहुजन समाजाची प्रगती होईल हे राजर्षी शाहू नी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी कोल्हापूर शहरात जातवार वसतीगृहे सुरू केली. ही वसतीग्रहे व्यवस्थित सुरू राहावीत. म्हणून त्यांच्या सांपत्तिक स्थिती चांगली नसल्याने महाराजायांनी रुकडी येथील राजेबागस्वार इनाम जमीन लंगट उत्पन्नातील रुपये ५००/- ठेवून घेवून बाकीची सर्व रक्कम मोहमिडन एज्युकेशन सोसायटी कोल्हापूरकडे पाठवण्याचा आदेश २८/०६/१९१९ रोजी दिला होता. अशाच प्रकाराचा

आदेश ०५/०३/१९२० व ०४/०८/१९२० रोजी महाराजांनी काढले होते.

**समारोप -**

रुकडी जिल्हा कोल्हापूर येथील हजरत पीर राजेबागस्वार हे सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान आहे. म्हणून त्यांचा उरूस सर्वजण एकत्र येऊन मोठ्या उत्साहाने साजरा करतात. या दर्गाच्या इनाम जमिनीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून राजर्षी शाहू महाराजांनी मुस्लिम बोर्डिंगची कायम स्वरूपी व्यवस्था केली होती. याशिवाय उरुसाच्या वेळी व दर गुरुवारी अनेक लोक दर्ग्याला भेट देतात.

**संदर्भ**

१) Graham Report
२) चौधरी किफा (संता) कोल्हापूर गॅझेटिझर पृ ६८६
३) मोडक ब.प्र.(अनु ) कोल्हापूर गेझ १८८६-पृ ४७८
४) सुफी प्रकाशन २००९ पृ -१६ - १७
५) किफा पृ - २२
६) शेख डॉ.एजाज - सुफी संप्रदाय चिन्मय प्रकाशन २००९ पृ- ९३ - ९४
७) वकील डॉ.अलीम - सूफींची आदमगिरी विश्वकर्मा प्रकाशन २०१९ पृ-१२५
८) मराठी विश्वकोश माहिती
९) मुल्ला याकूब (गल्फवाले)यांची-मुलाखत
१०)कोल्हापूर गेझेटीझर १८८६ - ४७७ - ७८
११)उरुसाची जाहिरात
१२)Graham Doco Statistical Report on tha Pricipality Kolhapur p - 32
१३)जाधव डॉ.रमेश,राजर्षी शाहू गौरव ग्रंथ पृ-१०९१
१४)पवार जयसिंगराव - राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक सुधार आज्ञापत्रे पृ-१६१ व राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक हुकूमनामे पृ-68